मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागूपर येथील न्यायालयीन इमारती, मा. न्यायमुर्ती यांची निवासस्थाने येथील साफसफाईचे कामे बाह्ययंत्रणेद्वारे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एचसीटी ५२१९/२७२/प्र.क्र.३८/का. ४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १० जुन, २०१९.

वाचा –

१) प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांची पत्रे क्र. N/२०१८, दि. १६/०८/२०१८ व क्र.१५६२/२०१९, दि. १८/०३/२०१९.

२) शासन पत्र, समक्रमांक, दि. २५/०१/२०१९.

३) शासन निर्णय, विधि व न्याय, क्र. एचसीटी ९३१४/४५८/प्र.क्र.५६/का.४, दि. ३०/०१/२०१७.

प्रस्तावना –

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथील मुख्य इमारत, विस्तारीत इमारत, तेथील आवार तसेच मा. न्याययमुर्तींच्या शासकीय निवासस्थानांच्या साफसफाई, देखभाल व व्यवस्थापनाचे बाह्ययंत्रणेद्वारे करावयाचे दोन वर्षाचे काम करण्यास शासन निर्णय, विधि व न्याय, दि. ३०/०१/२०१७ अन्वये प्रदान करण्यात आलेली मुदत दि. ३१/०३/२०१९ रोजी समाप्त झाली आहे. त्यानुसार खंडपीठ नागपूर प्रशासनाने नवीन सेवापुरवठादाराची निवड करण्याकरिता नव्याने ई- निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती शासनास केली होती. संदर्भ क्र. २ येथील शासन पत्रान्वये त्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार खंडपीठ प्रशासनाने ई-निविद प्रक्रिया राबवून नवीन सेवापुरवठादाराची निवड करण्यासाठी समिती गठित केली होती. समितीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त केलेल्या सेवापुरवठादारास मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी मान्यता प्रदान केली असून त्यानुसार उच्च न्यायालयाने सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय –

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथील मुख्य इमारत, विस्तारीत इमारत, तेथील आवार तसेच मा. न्यायमुर्तींच्या शासकीय निवासस्थानांच्या साफसफाई, देखभाल व व्यवस्थापनाचे दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२१ या दोन वर्षांच्या कालावधीतीलकाम यांत्रिकी तसेच मनुष्यबळ वापरून मेसर्स मल्टी युटिलिटी सर्विसेस टेंट (MUST), नागपूर या सेवापुरवठादाराकडून सर्व करांसहीत दरमहा रु. ७,८१,५१३.७५ या दराने करण्यास तसेच त्यानुषंगाने दोन वर्षासाठी येणाऱ्या एकूण **रु.१,८७,५६,३६०/- (रुपये अक्षरी एक कोटी सत्त्याऐंशी लक्ष छप्पन्न हजार तीनशे साठ फक्त)** इतक्या खर्चास सदर आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर मान्यता उपरोक्त सेवापुरवठादाराने निविदा प्रक्रियेसाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती खंडपीठ नागपूर येथील सक्षम प्राधिकारी यांनी साक्षांकित करण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर साफसफाईचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करताना उपरोक्त सेवापुरवठादारास तसेच उच्च न्यायालय प्रशासनास बाह्ययंत्रणेद्वारे करावयाच्या कामांसंदर्भात शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.

३. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी यानुषंगाने१५ दिवसांच्या आत संबंधित सेवापुरवठादाराशी योग्य तो करार करुन त्याची प्रत शासनास सादर करावी. उपरोक्त सेवाकरार दि. ३१/०३/२०२१रोजी आपोआप संपुष्टात येईल. या कराराची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रसारित करण्यास पूर्वपरवानगी मागण्यासाठी प्रस्ताव किमान दोन महिने आधी शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

४. याप्रित्यर्थचा होणारा खर्च हा “मागणी क्र. जे-१, २०१४ न्यायदान (अनिवार्य), १०२- उच्च न्यायालये (०३) (०१) प्रबंधक, अपील शाखा, (२०१४ ००९२) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वित्तिय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. प्रस्तुत आदेश हे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग चार, अनुक्रमांक ११ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे करावयाच्या कामांसंदर्भात प्रशासनिक विभागास प्राप्त अधिकारांतर्गत तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१०१३११०६३७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjeev R Keluskar

Digitally signed by Sanjeev R Keluskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a521517a0d3fba83ff4473cb0d448a75f9b7f83cba41836833b60c93758c804, cn=Sanjeev R Keluskar
Date: 2019.06.10 13:18:18 +05'30'

(संजीव केळुसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२. प्रबंधक (निरिक्षणे २), अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
३. प्रबंधक (वित्त व अर्थसंकल्प) अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
४. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र, दोन, नागपूर.
६. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
७. कक्ष अधिकारी, का. २३/२४ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती.